अध्यादेश व परिनियमांची तपासणी करण्यासाठी समितीचे गठन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण २०१५/प्र.क्र. २१९/१५/विशि-३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक - १२ ऑक्टोबर, २०१७.

वाचा -१) शासन निर्णय क्र. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र. १३६/विशि-३, दिनांक - १८/०७/२०११.

२) शासन निर्णय क्र. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र. १३६/विशि-३, दिनांक - १३/०१/२०१२.

३) शासन निर्णय क्र. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. २१९/विशि-३, दिनांक - ०६/१२/२०१६.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ५१ ते ५३ मधील तरतुदीनुसार संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांकडून प्राप्त होणाऱ्या परिनियम/अध्यादेशांना मान्यता देण्यापूर्वी तपासणी/छाननी करुन शासनास त्याबाबत शिफारस करण्याकरिता संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली अनुभवी व तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेल्या समितीचे पुनर्गठन करण्यात आले आहे.

तथापि, राज्यात दि. ११ जानेवारी, २०१७ पासून महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ रद्द होऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अंमलात आला आहे. त्यानुसार विद्यापीठातील संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ हे पद आता अस्तित्वात नाही.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांबरोबरच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या परिनियम/अध्यादेशांना मान्यता देण्यापूर्वी तपासणी/छाननी करुन शासनास शिफारस करण्याकरिता गठीत करण्यात आलेल्या समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन आता संदर्भ क्रमांक ३ मधील शासन निर्णय अधिक्रमीत करुन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ७२ व ७४ नुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांबरोबरच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचेकडून प्राप्त होणाऱ्या परिनियम, अध्यादेशांना मान्यता देण्यापूर्वी तपासणी/छाननी करुन शासनास त्याबाबत शिफारस करण्याकरिता संचालक,उच्च शिक्षण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद अनुभवी व तज्ञ व्यक्तींचा समावेश असलेली समिती पुनर्गठीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	सदस्याचे नांव	पदनांम
१)	संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे	अध्यक्ष
२)	श्री. विलास सपकाळ, माजी कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ	सदस्य
३)	कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड	सदस्य
४)	कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई	सदस्य
५)	श्री. बी. बी. पाटील, उपकुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव	सदस्य
६)	डॉ. राजेंद्र कांकरीया, माजी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	सदस्य
७)	श्रीमती परवीन सैयद, विधी अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे	सदस्य
८)	प्रशासकीय अधिकारी (विद्यापीठ शिक्षण संबंधित), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे	सदस्य सचिव

२. समितीकडे प्राप्त होणाऱ्या संदर्भांची संख्या व प्राथमिकता लक्षात घेऊन समितीने बैठका घेऊन, परिनियम, अध्यादेश, आदेश व शासन निर्णयांच्या आधारे शासनाला यथाशीघ्र अभिप्राय कळविण्यात यावेत.

३. समितीने नियमित बैठकांबाबतचा कार्यक्रम आखावा. समितीची बैठक संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी आपल्या स्तरावर विद्यापीठामध्ये आयोजित करावी व त्या विद्यापीठाने या बैठकीसाठी सदस्यांना आवश्यक ते मानधन अदा करावे तसेच अशासकीय सदस्यांना प्रवास भत्ता हा संचालनालय स्तरावरुन अदा करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१०१२१७२१५००६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Kharat

Digitally signed by Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, cn=Siddharth Kharat
Date: 2017.10.12 17:13:03 +05'30'

(सिध्दार्थ खरात)

सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत –

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे.
५) सर्व संबंधित समिती पदाधिकारी (टपालाने)
६) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

९) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) सहसचिव (विशि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२) उपसचिव (मशि/तांशि/साशि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३) निवडनस्ती.